# B.A. Part–I (Semester–I) (CBCS) Examination
## Optional Subject (Literature)
## MARATHI LITERATURE

Time : Three Hours] [Maximum Marks : 80

**सूचना :— सर्व** प्रश्नांची उत्तरे सोडवणे आवश्यक.

1. खाली दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडा :—

(1) ग्रामपंचायत निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला अन् उभा गाव ________ झाला.

(अ) चैतन्यमय (ब) सैरभैर

(क) गंभीर (ड) टवाळखोर

(2) धनूच्या विसाव्याचं आणखी एक ठिकाण म्हणजे गावातल्या चौकातील________ कट्टा.

(अ) आबाचा (ब) आडाचा

(क) रामभाऊचा (ड) रावसाहेबाचा

(3) तात्यांनी बैलंच तशी सांभाळलेली. अंगावर कधी ________ बसू दिली नव्हती बैलांच्या.

(अ) गोमाशी (ब) चिमणी

(क) माशी (ड) कावळा

(4) रामभाऊंचा ________ आबासाहेब वचक दांडगा पण कामात उंडगा एककल्ली शब्दागणिक शिवी.

(अ) विरूद्ध (ब) बरोबर

(क) पेक्षा (ड) उलट

(5) सदाण्णा शिंदे________ करून खाणारा माणूस.

(अ) कष्ट (ब) चोरी

(क) लबाडी (ड) सावकारी

(6) रामभाऊंचा स्वभाव आणि त्याची _______ चाल माहीत असल्यामुळे रावसाहेबाने त्यांचे बोलणे गंभीरपणे घेतले नाही.

(अ) नागमोडी (ब) तिरकी

(क) गंभीर (ड) जलद

(7) जलस्वराज्य मोहिमेतील प्रकल्पामध्ये गावाचा समावेश झाला आणि गावाला _________ आल्यासारखं झालं.

(अ) उधान (ब) वैफल्य

(क) चैतन्य (ड) नैराश्य

(8) तुमच्या गावात ________ सुरू होत आहे. ही परिवर्तनाची नांदी आहे.

(अ) वाचनालय (ब) आखाडा

(क) कारखाना (ड) नाट्यगृह

(9) कुणाचीच भीडभाड न ठेवणारी ________ भांडकुदळ म्हणून साऱ्या गावाला परिचित.

(अ) राजकन्या (ब) शेवंताबाई

(क) भागाबाई (ड) गिरजी

(10) पण तो वार्ड दादांचा असल्याने ________ मेंबर पडतो.

(अ) विकासचा (ब) आबाचा

(क) रामभाऊंचा (ड) ग्रामपंचायतचा

(11) 'गणपत वाणी' कवितेचे कवी कोण ?

(अ) नारायण कुळकर्णी (ब) बा.सी. मर्ढेकर

(क) केशवसुत (ड) कुसुमाग्रज

(12) बिरसा मुंडा या कवितेचे कवी कोण ?

(अ) भुजंग मेश्राम (ब) अजय खडसे

(क) अनुराधा जोशी (ड) यशवंत मनोहर

(13) शब्दांची पूजा करीत नाही मी ________ आरती गातो.

(अ) गणपतीची (ब) बाबासाहेबांची

(क) माणसांसाठी (ड) देवीची

(14) उमटवायची रोज दिंगताच्या भाळी
नव्या शाईच्या ________ स्वाक्षरी.

(अ) सौंदर्याची (ब) पेनची

(क) शूरांची (ड) दमाने

(15) 'बाई' म्हणून मिळणारे
________ नकोत मला.

(अ) सन्मान (ब) दागदागीणे

(क) नवीन शालू (ड) ग्रेस मार्क्स

(16) पद्मरेखा धनकर यांनी लिहिलेल्या कवितेचे नाव सांगा.

(अ) नवीनच रोग जडलाय अताशा (ब) पोरी

(क) मी एक स्त्री (ड) गणपत वाणी

(17) मी एक स्त्री ! ही कविता कोणाची आहे ?

(अ) ज्योती लांजेवार (ब) अनुराधा पाटील

(क) महिला अमरशेख (ड) अनुजा जोशी

(18) कवी अजय खडसे यांच्या कवितेचे नाव सांगा.

(अ) रॅशनल (ब) नॅशनल

(क) फॅशिष्ट (ड) कॉमन

(19) गणपत वाणी बिडी पितांना
_______ नुसतीच काडी.

(अ) चावायाचा (ब) फिरवायाचा

(क) आदळायाचा (ड) फेकायाचा

(20) ती मोजेल मुकाट
हमखास चुकणारे आयुष्याचे
________ पंचावन्न

(अ) गुणाकार (ब) पहिले पाढे

(क) वर्ष (ड) दिवस 20×1=20

2. खाली दिलेल्या वाक्यांचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा :—

(अ) 'रमेश' गाडीखालनं चालणाऱ्या कुत्र्याला वाटत असतं गाडी आपणच ओढतो.

**किंवा**

रामभाऊंचा स्वभाव आणि त्याची तिरकी चाल माहीत असल्यामुळे रावसाहेबाने त्यांचे बोलने गंभीरपणे घेतले नाही.

(ब) याचा अर्थ कुणी कुणासाठी थांबत नसतो. अडथळा आला तर तो पार करीत असतो.

**किंवा**

बोलणाऱ्यांपेक्षा कृती करणाऱ्या व समाजापुढे आदर्श ठेवणाऱ्या व्यक्तीच समाजाला पुढे नेत असतात. 10

3. महेंद्र कदम यांनी 'धूळपावलं' यामध्ये रंगवलेल्या राजकारणाचे चित्रण तुमच्या शब्दात लिहा.

**किंवा**

धूळपावलं या कादंबरीचा गोषवारा तुमच्या शब्दात शब्दबद्ध करा. 10

4. गावातल्या चौकातील आडाचा कट्टा याचे वर्णन करा.

**किंवा**

तात्यांनी "बैलं सोडून दिली'' ते का ? पटवून सांगा. 5

5. पेप्रात 'विकास शिंदेसह सहा जप अटकेत' अशी बातमी छापून आली. ती का आली ? ते लिहा.

**किंवा**

धनू आणि विकास-यांच्यावर झालेल्या हल्ल्याचे वर्णन करा. 5

6. खालील कवितेच्या ओळीचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा :—

(अ) चेहरा नसलेल्या अपुऱ्या शिल्पासारख्या बेसूर बायानो !
माझे अंगण पांढरे झाले तुमच्या रांगोळयांनी.

**किंवा**

आईला पहाटेच जात्यावर तुझी गाणी गातांना
मी अैकत असतो डोळे मिटून :

(ब) सोयीनुसार सारेच बदलले तरी
तू शब्दांचे दुकान थाटले नाही,
रोज रात्री मरण जगतांना असे
एकही स्मशान भेटले नाही

**किंवा**

मी नाकारलीय ठरीव सही
अन् सारेच नाकारताहेत मला
बँकेत पाय ठेवू देत नाहीय
चेक येत आहेत वापस 10

7. भालचंद्र नेमाडे यांनी स्त्रीजीवनाची व्यथा कवितेमधून कशी प्रकट केली ते लिहा.

**किंवा**

कवी यशवंत मनोहर माणसांसाठी आरती का गातात ? कवितेच्या आधारे स्पष्ट करा. 10

8. बा.सी. मर्ढेकर यांनी 'गणपत वाणी' कवितेमध्ये कशाचे चित्रण केले आहे ?

**किंवा**

'मी एक स्त्री......!' या कवितेचा अर्थ तुमच्या शब्दात सांगा. 5

9. रॅशनल या कवितेचा आशय लिहा.

**किंवा**

'पोरी' या कवितेतील स्त्रिदु:खाचे वर्णन करा. 5